


सीमाभागातील मराठी जनतेचे मुखपत्र

# तरुण भारत

बेळगाव

www.tarunbharat.com




☎ २४०४३३३ ✦ वर्ष ९९ अंक २०३ ✦ पाने १४ ✦ ₹ ५.००

मंगळवार दि. २५ जुलै २०१७

बेळगाव ● गोवा ● मुंबई ● सिंधुदुर्ग ● रत्नागिरी ● कोल्हापूर ● सांगली ● सातारा

ॲड. शिवाजीराव जाधव यांची म. ए. समिती सदस्यांना माहिती | कर्नाटक सरकारकडून वेळकाढूपणाचा खेळ सातत्याने सुरूच

# आधी युक्तिवादावर निर्णय, नंतर मूळ दावा

विशेष प्रतिनिधी
नवी दिल्ली

सीमाप्रश्नी सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या दाव्याच्या संदर्भात तज्ज्ञ वकिलांनी सीमावासियांची बाजू भक्कमपणे मांडण्याची तयारी केली आहे. परंतु सीमाप्रश्नाचा दावा हा सर्वोच्च न्यायालयाच्या कक्षेमध्ये येत नाही. तो संसदेमध्येच सोडविणे आवश्यक आहे, असा युक्तिवाद कर्नाटकने सर्वोच्च न्यायालयात एका अर्जाद्वारे केला आहे. या युक्तिवादावरील निर्णयानंतर सीमाप्रश्नाच्या मूळ दाव्याची सुनावणी होईल, अशी माहिती ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ ॲड. शिवाजीराव जाधव यांनी नवी दिल्ली येथे म. ए. समितीच्या आमदार व पदाधिकाऱ्यांना दिली.

महाराष्ट्र शासन आणि नियुक्त केलेल्या वकील मंडळींनी दावा चालविण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांसह सर्व तयारी केली आहे. मात्र सर्वोच्च न्यायालयात निर्माण होणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे सुनावणी लांबणीवर जात आहे. ही याचिका न्यायालयाच्या कक्षेत येत नसल्याचा दावा कर्नाटकच्या बाजूने मांडण्यात आला आहे. यामुळे दाव्यामध्ये प्रामुख्याने हा मुद्दा खोडून काढल्यानंतर सुनावणीच्या कामकाजास प्रारंभ होणार असल्याची माहिती ॲड. शिवाजीराव जाधव यांनी दिली.

बेळगावसह सीमावासियांचे लक्ष सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीकडे लागले होते. मात्र सोमवार दि. २४ रोजी होणारी सुनावणी पुन्हा लांबणीवर गेली आहे. यामुळे याबाबत महाराष्ट्र शासनाचे सर्वोच्च न्यायालयातील वकील शिवाजीराव जाधव यांच्याकडून सीमाप्रश्नाबाबतची माहिती घेतली असता, ते म्हणाले दोन राज्यांतील वाद असल्याने प्राधान्य मिळत नाही. मात्र दाव्याकरिता लागणाऱ्या कागदपत्रांसह आवश्यक तयारी करून वकील मंडळी सज्ज आहे. पण न्यायालयाकडून सुनावणी होत नाही. यापूर्वी १० मार्च २०१७ रोजी सुनावणी होणार होती. मात्र त्यावेळीदेखील न्यायालय भरले नाही.




**सुनावणी....**

- महाराष्ट्राच्या वकिलांकडून कागदपत्रांची तयारी पूर्ण
- कर्नाटकच्यावतीने वाद संसदेत सोडविण्याचा आग्रह
- आता पुढील सुनावणीकडे सीमावासियांचे लक्ष

पुन्हा दि. २४ जुलै रोजी सुनावणी होईल अशी अपेक्षा होती. पण आजदेखील सुनावणी लांबणीवर गेली आहे. सुनावणी लांबणीवर जात आहे, यांची खंत आम्हालादेखील आहे. कारण हा प्रश्न वैयक्तिक नसून सीमाभागातील २५ लाख जनतेच्या भावना या दाव्यात गुंतल्या आहेत, याची जाण आपल्याला आहे. यामुळे सीमावासियांच्या मनात संशय निर्माण होणे ही बाब योग्य आहे. मात्र महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या वकील मंडळींनी आपली जबाबदारी योग्यपणे हाताळली आहे.

यापूर्वीच निवृत्त न्यायमूर्ती मनमोहन सरीन यांची नियुक्ती करून साक्ष नोंदविण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती लोढा यांनी दिला होता. यानुसार साक्षीदारांची प्रतिज्ञापत्रे तसेच आवश्यक कागदपत्रांची तयारी केली आहे. मात्र कर्नाटक सरकारने साक्ष नोंदविण्यास आपण सहकार्य करणार नाही, अशी भूमिका घेऊन सीमावाद सर्वोच्च न्यायालयाच्या कक्षेत येत नसून संसदेत याबाबत तोडगा काढण्याची आवश्यकता असल्याचा अंतरिम अर्ज कर्नाटकाच्यावतीने सर्वोच्च न्यायालयात दाखल केला आहे. यापूर्वी दि. १२ सप्टेंबर २०१४ रोजी न्यायमूर्ती लोढा यांच्या कालावधीत या मुद्द्यावर चर्चा झाली होती. घटनेच्या १३१ कलमानुसार न्यायालयात याबाबत दाद मागता येते, असा युक्तिवाद ॲड. हरीष साळवे यांनी केला होता. त्यामुळे याचा सारासार विचार करून न्यायमूर्ती लोढा यांनी कर्नाटकचा अर्ज फेटाळला होता. सीमाप्रश्नाबाबतची याचिका चालविण्यास सहमती दर्शविली होती. त्यानंतर निवृत्त न्यायमूर्ती मनमोहन सरीन यांची नियुक्ती करून साक्ष नोंदविण्याचा आदेश दिला होता.

मात्र कर्नाटकच्यावतीने अंतरिम अर्ज दाखल करून वाद न्यायालयाच्या कक्षेत येत नसल्याचा दावा केला आहे. यामुळे याबाबत युक्तिवाद करण्याची सूचना न्यायमूर्ती मिश्रा यांनी केली आहे. त्यामुळे याबाबत पुन्हा युक्तिवाद होणार आहे. पण सध्या याबाबत सुनावणी लांबणीवर पडत असल्याची माहिती ॲड. शिवाजीराव जाधव यांनी दिली.

कृपया पान ९ वर

### मराठी भाषिकांवरील अन्यायाबाबतचे सचित्र पुस्तक तयार

सीमाप्रश्नाबाबत सर्वोच्च न्यायालयात दावा सुरू आहे. मात्र बेळगाव हे कर्नाटकचे असल्याचे पुरावे निर्माण करण्यासाठी कानडीकरणाची सक्ती आणि या ना त्या मार्गाने मराठी भाषिकांवर अन्याय केला जात आहे. याबाबतचे सचित्र पुस्तक तयार करण्यात आले आहे. सदर पुस्तक ॲड. शिवाजी जाधव यांना देऊन सीमाभागात होणाऱ्या अन्यायाबाबतची माहिती दिली. न्यायालयाकडे विनंती करून सुनावणी तातडीने घेण्याची विनंती आमदार संभाजी पाटील यांनी केली आहे.

**तरुण भारत**
**निवेदन**

- आपल्याला नवीन अंक सुरु करावयाचा असल्यास
- अंक नियमित मिळत नसल्यास
- पत्त्यात बदल असल्यास
- वेळेवर मिळत नसल्यास
- अन्य काही सूचना असल्यास

पुढील क्रमांकावर संपर्क साधावा.

भावेश : 8147738640
सुधीर : 9743909247
गजानन : 9379844107
प्रशांत : 9379844108

## काँग्रेसचे सहा खासदार ५ दिवसांसाठी निलंबित

**नवी दिल्ली :** गोरक्षकांकडून सुरू असलेल्या हिंसाचाराच्या मुद्यावर सोमवारी काँग्रेसच्या खासदारांनी आक्रमक भूमिका घेतली. यावेळी लोकसभा अध्यक्षा सुमित्रा महाजन यांच्या दिशने कागद भिरकावल्याने काँग्रेसच्या सहा खासदारांना पाच दिवसांसाठी निलंबित करण्यात आले. यामध्ये जी. गोगाई. के. सुरेश, अधिरंजन चौधरी, रणजित रंजन, सुश्मिता देव आणि एम. के. राघवन यांचा समावेश आहे. काँग्रेस खासदारांच्या गदारोळानंतर सभागृह कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले. गोरक्षकांकडून सुरू असलेल्या हिंसाचाराच्या मुद्यावर सोमवारी लोकसभेत विरोधकांनी आवाज उठविला.

## समझोता स्फोटामागे पाक दहशतवादीच ?

**नवी दिल्ली :** २००७ मध्ये झालेल्या समझोता एक्स्प्रेस स्फोटाचे सूत्रधार आणि हा स्फोट घडवून आणणारे दहशतवादी पाकिस्तानातीलच आहेत, असा सनसनाटी दावा एका प्रसिद्ध वृत्तवाहिनीने केला आहे. या प्रकरणात सध्या 'हिंदू दहशतवादी' म्हणून ओळखले जाणारे कर्नल प्रसाद पुरोहित आणि साध्वी प्रज्ञासिंग यांच्यावर खटला सुरू आहे. तथापि, त्यांना या खटल्यात मुद्दाम गोवण्यात आले असून खरे गुन्हेगार पाकिस्तानी दहशतवादीच आहेत, असे या वाहिनीने एका व्हिडीओ सीडीद्वारे प्रदर्शित केले आहे.

## आयडिया-व्होडाफोन विलीनीकरणास मंजुरी

**नवी दिल्ली :** आयडिया सेल्युलर आणि व्होडाफोन इंडिया यांच्या विलीनीकरणास स्पर्धा आयोगाकडून परवानगी देण्यात आली. या कंपन्यांच्या विलीनीकरणाने भारतातील दूरसंचार क्षेत्रातील सर्वात मोठी कंपनी उदयास येणार आहे. कोणत्याही अटींशिवाय आयोगाकडून दोन्ही कंपन्यांच्या विलीनीकरणास मंजुरी मिळाली. या विलीनीकरणावेळी २३ अब्ज डॉलर्सच्या रकमेचे होणारे हस्तांतर देशातील उद्योग क्षेत्रातील सर्वात मोठे असेल, असे शरदुल अमरचंद मंगलदास ॲण्ड कंपनीने सांगितले.

## भाजीपाल्याच्या पिकात करडीगुद्दी येथे गांजा लागवड

७ किलो गांजा जप्त, तिघांविरुद्ध एफआयआर

प्रतिनिधी
बेळगाव

करडीगुद्दी (ता. बेळगाव) येथे भाजीपाल्याच्या पिकात गांजा लागवड करणाऱ्या तिघा जणांविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आले आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनीच छापा टाकून ही कारवाई केली असून यासंबंधी एका तरुणाला अटक करण्यात आली आहे. शेतातून सात किलो १०० ग्रॅम इतका ओला गांजा जप्त करण्यात आला आहे.

पोलीस उपायुक्त अमरनाथ रेड्डी यांनी करडीगुद्दी येथील गांजाची झाडे लावलेल्या शेतात स्वत: जावून ही कारवाई केली आहे. यासंबंधी सायंकाळी मारिहाळ पोलीस स्थानकात एफआयआर दाखल करण्यात आला असून



एका तरुणाला अटक करण्यात आली आहे. उर्वरित दोघे जण फरारी आहेत.

सुभाष निंगाप्पा चौगुले (वय १८, रा. करडीगुद्दी) असे अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे. सुभाषचे वडील निंगाप्पा सोमाप्पा चौगुले, अर्जुन बसवंत चौगुले यांच्यावरही अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यांतर्गत एफआयआर दाखल करण्यात आला असून निंगाप्पा व अर्जुन फरारी आहेत.

कृपया पान ९ वर

## ...आम्ही महाराष्ट्रात जाणारच आहोत !

आमदार अरविंद पाटील यांनी केडीपी बैठकीत ठणकावले | आमदारांनी मराठीतून उठविला आवाज : वातावरण गंभीर

प्रतिनिधी
बेळगाव

महाराष्ट्रात जाण्यासाठी आमचा कायदेशीर लढा सुरू आहे. आणि या लढ्यात आमचा विजय होणार असून आम्ही महाराष्ट्रात जाणारच आहोत... खानापूरचे आमदार अरविंद पाटील यांनी सोमवारी जिल्हा पंचायत सभागृहात झालेल्या कर्नाटक विकास आढावा (केडीपी) बैठकीत मराठीतूनच हे ठणकावले. यामुळे बैठकीत उपस्थित जिल्हा पालकमंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांची कोंडी झाली. जिल्हा पालकमंत्री रमेश जारकीहोळी यांनी नेहमीचे महाजन अहवालाचे तुणतुणे वाजवत महाजन अहवाल हाच अंतिम असल्याचे यावेळी सांगितले.

केडीपी बैठकीत आमदार अरविंद पाटील यांनी खानापूर तालुक्यातील पाण्याचा मुद्दा उपस्थित केला. खानापुरात मलप्रभा नदी वाहत असतानाही या नदीचे पाणी हुबळी व धारवाडला नेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. खानापूरची जनता तहानलेली असताना येथील नदीचे पाणी अन्यत्र वळविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत, असे त्यांनी मराठीतून सांगताच अथणीचे आमदार लक्ष्मण सवदी यांनी याला आक्षेप घेतला. यावर अरविंद पाटील यांनी मराठीतून सांगितले तरच त्यांना चांगले समजते, असे म्हटले. महाराष्ट्राचे पाणी पिऊनच तुम्ही मोठे झाल्याचे सांगितले. तर जिल्हा पालकमंत्री रमेश जारकीहोळी यांनी मराठीतून बोलल्यास सीमाभाग काही महाराष्ट्रात जाणार नसल्याचे म्हटले. यामुळे बैठकीत वातावरण गंभीर बनले. तर नेहमीच मराठीच्या विरोधात असणाऱ्या जिल्हाधिकारी एन. जयराम यांनी कन्नडमध्ये बोला, असे आमदारांना दबक्या आवाजात सांगितले. अशाप्रकारे आरोप-प्रत्यारोप सुरूच राहिल्याने शेवटी पालकमंत्र्यांनीच या वादावर पडदा पाडला. खानापूर तालुक्यात एकही बहुग्राम पाणी योजना राबविण्यात आली नाही. ही योजना या तालुक्यात राबविण्यासाठी आमदारांनी प्रयत्न केल्याचे ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.



आमदार अरविंद पाटील यांनी मराठीतून आपले म्हणणे मांडले. शेजारी विधानपरिषद सदस्य विवेक पाटील, आमदार उमेश कत्ती, महांतेश कवटगीमठ आदी.

### आश्वासनाची अंमलबजावणी अद्यापही नाहीच...

विधानपरिषद सदस्य महांतेश कवटगीमठ यांनी बेळगावात झालेल्या अधिवेशनात वीजमंत्री डी. के. शिवकुमार यांनी खानापूर तालुक्यातील या भागात भूमिगत वीजवाहिन्या घालून वीजपुरवठा करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र याची अंमलबजावणी अद्यापही झाली नाही, असे सांगितले.

कृपया पान ९ वर

## सात फुटीरतावादी नेत्यांना अटक

'एनआयए'ची कारवाई : निवासांवर छापे; दहशतवाद्यांना आर्थिक मदत केल्याचा ठपका

वृत्तसंस्था
श्रीनगर

भारताविरोधात नेहमीच गरळ ओकणाऱ्या काश्मीरमधील फुटीरतावादी नेत्यांना राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) सोमवारी दणका दिला. दहशतवाद्यांना आर्थिक मदत केल्याप्रकरणी फुटीरतावादी नेता एसएएस गिलानी याचा जावई व तेहरिक-ए-हुर्रियतचा नेता मिरवाईज उमर फारुख, नईम खान, शाहिद-उल-इस्लाम, अल्ताफ शहा, मेहराज कालवाल, हुर्रियतचा प्रवक्ता अयाज अकबर आणि पीर सैफुल्ला यांना अटक करण्यात आली आहे. तसेच छाप्यामध्ये दोन कोटींच्या रोकडसह महत्त्वाची कागदपत्रेही जप्त करण्यात आली आहेत. सर्वांची




दिल्ली येथे चौकशी होणार असल्याचे एनआयएच्या सूत्रांनी स्पष्ट केले.

फुटीरतावादी नेते हवालाच्या माध्यमातून पाकिस्तानमधील दहशतवाद्यांना आर्थिक मदत करत असल्याचे एका वृत्त वाहिनीच्या स्टिंगमध्ये स्पष्ट झाले होते. याप्रकरणी एनआयएने तपास सुरू केला. एका पथकाने मिरवाईज उमर फारुख आणि जावेद अहमद बाबा ऊर्फ गाझी यांची चौकशीही केली होती. यानंतर दोघांच्या बँक खात्यांसह मालमत्तेचीही माहिती घेतली होती. एनआयएच्या छाप्यात दोन कोटींची रोकड आणि बंदी घालण्यात आलेल्या दहशतवादी संघटना लष्कर-ए-तोयबा आणि हिजबुल मुजाहिद्दीन यांच्याशी करण्यात आलेल्या पत्रव्यवहाराची कागदपत्रेही सापडली होती.

**शाळांसह सरकारी इमारतीच्या नुकसानीचा रचला होता कट**

'एनआयए'ने केलेल्या तपासात फुटीरतावादी नेत्यांकडून दहशतवाद्यांना आर्थिक मदत मिळत असल्याचे स्पष्ट झालेच. त्याचबरोबर जम्मू-काश्मीरमधील शाळा आणि सरकारी इमारतीच्या नुकसानीचा कटही रचला असल्याची धक्कादायक माहितीही समोर आली. त्याचबरोबर काश्मीरमधील सुरक्षा दलावरील दगडफेकीतही संशयित आरोपींकडूनच आर्थिक रसद पुरवली जात असल्याचे उघड झाले आहे.

### अटक नेते दुसऱ्या फळीतील

सोमवारी अटकेत घेण्यात आलेले बहुतेक नेते दुसऱ्या फळीतील मानले जातात. मागच्या पिढीतील फुटीर संघटनांचे नेते आता वयोवृद्ध झाले आहेत, परिणामी, त्यांची जागा घेणारी नवी पिढी उदयाला येत आहे. काश्मीरमध्ये हिंसाचार सातत्याने सुरू रहावा व सरकारची अडचण व्हावी, अशी भूमिका या संघटनांनी नेहमी घेतली आहे. आता या संघटनांना सवलती न देता त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची योजना आहे.

## निठारी हत्याकांडातील पंधेर, कोलीला फाशी

सीबीआय न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

निठारी हत्याकांडप्रकरणी गाझियाबाद सीबीआय न्यायालयाने सोमवारी दोषी मनिंदरसिंग पंधेर आणि सुरेंद्र कोलीला फाशीची शिक्षा सुनावली आहे. न्यायाधीश पवनकुमार तिवारी यांनी हा निकाल दिला आहे. २००६ साली निठारी हत्याकांड देशभर गाजले होते. पंधेर आणि कोली या दोघांनी मिळून १५ हून अधिक लहान मुलींचे अपहरण करून त्यांच्यावर अत्याचार केल्याचे व त्यांचा खून केल्याचे तपासात निष्पन्न झाले होते.



७ मे २००६ रोजी एका २१ वर्षीय तरुणीचे अपहरण झाल्याचे पुढे आल्यावर हे प्रकरण उघडकीस आले. पोलीस दलातील विविध पथकांनी याचा शोध घेतला होता. या तरुणीच्या मोबाईल कॉल्सवरून मनिंदरसिंग पंधेर याचे नाव आढळले. त्यानंतर पोलिसांनी पंधेर आणि त्याचा नोकर कोलीला ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केल्यानंतर संपूर्ण निठारी हत्याकांड बाहेर पडल्यानंतर संपूर्ण देश हादरून गेला होता. पोलिसांनी २९ डिसेंबर २००६ रोजी संपूर्ण घराची कसून तपासणी केली असता १९ मृतदेहांचे सांगाडे सापडले होते.

## गुजरातमध्ये पूरस्थिती गंभीरच

**अहमदाबाद :** गुजरातमध्ये पावसाचा प्रचंड धुमाकूळ सुरु असून बनासकांठा जिल्हा जलमय झाला आहे. प्रचंड पाऊस आणि पुराच्या पाण्यामुळे संपूर्ण जिल्हाच पाण्याखाली गेला असून अनेक गावांमधील पाण्याची पातळी ४ ते ६ फुटांवर गेली आहे. पुरामुळे ७७ हून अधिक जणांचा मृत्यू झाला असून ९०० हून अधिक पशुधनाची हानी झाली आहे. एनडीआरएफच्या पथकांसह सेनदलाचे जवानही बचावकार्यात उतरले असून ७ हजारहून अधिक नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यात आले आहे. मुख्यमंत्री विजय रुपानी यांनी आपत्कालीन बैठक घेऊन राज्याच्या तसेच बचाव पथकाच्या विविध अधिकाऱ्यांना सूचना केल्या आहेत. अजूनही दोन दिवस पावसाची शक्यता आहे.

### आतील पानात

- बहुग्राम पाणी योजनांवरून अधिकारी धारेवर.........पान ३
- बेळगावमध्ये 'मंगळागौर' परंपरेचा अखंड वसा......पान ५

अस्मिता ▪ पान १२ वर ▪

### रेशमी चिमटे

• जगदीश कुंटे •



अभिनंदन ! सभागृहातून निलंबीत होऊन तुम्ही पक्षात नवचैतन्य आणलंय !!

## गरिबातील गरीबही सशक्त होणे आवश्यक...!

मावळते राष्ट्रपती प्रणव मुखर्जींचा संदेश | रामनाथ कोविंद आज मान्यवरांच्या उपस्थितीत होणार शपथबद्ध

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

आपल्या राजकीय जीवनात आपण देशाला जितके दिले, त्यापेक्षा कितीतरी जास्त देशाने आपल्याला दिले आहे. मी भारतातील जनतेचा नेहमीच कृतज्ञ राहीन, अशा भावोत्कट शब्दात मावळते राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी आपले निरोपाचे भाषण सोमवारी केले. जोपर्यंत गरिबातील गरीब व्यक्ती सशक्त होत नाही, तोपर्यंत देश बलवान होणार नाही, असेही त्यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले. मुखर्जी यांनी आपल्या संदेशात भावी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचे अभिनंदन करून त्यांना सुयश चिंतीले. याप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही मुखर्जी यांच्या राष्ट्रपती पदावरील कार्याचा यथोचित गौरव केला.



नवी दिल्ली : कार्यक्रमाला उपस्थित प्रणव मुखर्जी आणि रामनाथ कोविंद.

राष्ट्रपती पदावरून निवृत्त होताना साहजिकच माझे मन भरून आले आहे. पाच वर्षांपूर्वी जेव्हा मी राष्ट्रपती पदाचा स्वीकार केला, तेव्हा राज्यघटनेच्या सन्मानाची सुरक्षा करणे हे माझे उत्तरदायित्व होते. माझ्या सर्व सार्वजनिक कालखंडात देशाने मला, मी दिले त्यापेक्षाही जास्त दिले. कृतकृत्य भावनेने मी पदमुक्त होत आहे, असे उद्गार मुखर्जी यांनी काढले.

दरम्यान, भावी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचा मंगळवारी दुपारी शपथविधी होणार असून त्यांना भारताचे सरन्यायाधीश जे. एस. खेहार त्यांना शपथ देतील.

### मुखर्जी म्हणतात...

- ५० वर्षांच्या सार्वजनिक जीवनात घटना हाच ध्यास, संसद हेच मंदिर
- विकासाचे लाभ तळागाळातील जनतेला मिळाले तर खरा विकास
- आपल्या सर्वांची बांधिलकी गरिबातील गरीब व्यक्तीशी असणे अत्यावश्यक
- बहुविविधता हा भारताचा आत्मा, तर क्षमाशीलता हे सांस्कृतिक वैशिष्ट्य

## इस्रोचे माजी अध्यक्ष प्रा. यु. आर. राव यांचे निधन

प्रतिनिधी
बेंगळूर

ज्येष्ठ वैज्ञानिक आणि भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे (इस्रो) माजी अध्यक्ष प्रा. यु. आर. राव (वय ८५) यांचे रविवारी मध्यरात्री निधन झाले. बेंगळुरातील इंदिरानगर येथील निवासस्थानी त्यांची प्राणज्योत मालवली. आर्यभट्ट, भास्कर, ॲपल रोहिणी, बहुउद्देशीय इन्सॅट यासह १८ उपग्रहांच्या प्रक्षेपणात त्यांचे योगदान होते.



प्रा. यु. आर. राव यांनी भारताचा पहिला-वहिला कृत्रिम उपग्रह आर्यभट्टच्या निर्मितीत प्रमुख भूमिका बजावली. इतकेच नव्हे तर मंगळयानाच्या योजनेतही त्यांचा वाटा मोलाचा होता. प्रख्यात वैज्ञानिक एम. जी. के. मेनन, सतीश धवन, विक्रम साराभाई यांच्यासोबत त्यांनी काम केले. सतीश धवन यांच्या निवृत्तीनंतर १९८४ ते १९९४ या १० वर्षांच्या कालावधीत इस्रोचे अध्यक्षपद भूषविले. त्यांना पद्मभूषण आणि पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. याशिवाय आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध १० पुरस्कारांचे ते मानकरी ठरले होते.

DSK / JG